City Pulse

रमाई गौरव पुरस्काराने दामिनी डोंगरे सन्मानित

टाकरखेडा संभू : वंचित बहुजन युवा आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष दामिनी डोंगरे यांना नुकताच रमाई गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांना रमाई महिला चळवळीच्या साहित्य संमेलनात पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्यामध्ये आंबेडकरी महिला चळवळीत कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांना कार्य करण्याची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने रमाई फाउंडेशन, भय्यासाहेब उपाख्य यशवंतराव आंबेडकर प्रतिष्ठान, औरंगाबादच्या वतीने दरवर्षी रमाई गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यावर्षीच्या रमाई गौरव पुरस्काराने चांदूरबाजार तालुक्यातील तळवेल येथील वंचित बहुजन युवा आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष दामिनी डोंगरे यांना सन्मानित करण्यात आले. दामिनी डोंगरे या वंचित बहुजन युवा आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष आहेत.

अ. भा. ग्रामीण पत्रकार संघाची नांदगाव तालुक्याची बैठक

नांदगाव खंडेश्वर : अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ, नांदगाव खंडेश्वर तालुका शाखेची वार्षिक बैठक नुकताच पार पडली. केंद्रीय कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष युसूफ खान यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रा. रवींद्र मेंढे तसेच राज्य सचिव बाळासाहेब सोरगीवकर यांची उपस्थिती होती. बैठकीमध्ये पत्रकारांच्या विविध विषयांवर चर्चा होऊन सन २०२४ -२५ करिता नवीन तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात आली. त्यामध्ये तालुका अध्यक्षपदी डॉ. संजय जेवडे, तालुका उपाध्यक्षपदी विशाल ढवळे, संजय पोफळे, सचिवपदी श्याम बोरकर, सहसचिवपदी उमेश चौकडे, संघटकपदी अमोल धवसे , कोषाध्यक्षपदी प्रा. गजानन काकडे यांची वर्णी लागली. सदस्य म्हणून सुरेश ढवळे, प्रदीप जोशी, श्याम शिंदे, दुर्गेश सोळंके, भगवंत ब्राह्मणवाडे, डॉ. वासुदेव गावंडे, विवेक पाठक, आशिष हटवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. बैठकीचे संचालन व प्रास्ताविक उमेश चौकडे तर आभार प्रदर्शन श्याम बोरकर यांनी केले.

श्री गोविंदप्रभू संस्थेकडून रक्तदान

नांदगाव पेठ : श्री गोविंदप्रभू बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नुकताच रक्तदानाचा उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये पिंपळविहीर व नांदगाव पेठच्या युवकांनी ४२ डिग्री तापमानातही स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासली. गोविंदप्रभू संस्थेचे अध्यक्ष दिनेश धसकट व जनकल्याण फाउंडेशनचे अध्यक्ष दिनकर सुंदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विक्रम मांडवकर, ऋषिकेश ठाकरे, आशिष ठाकरे, श्रीलेश ठाकरे, मंगेश वट्टी, दिनेश चौधरी, राजेंद्र मानवटकर, रोशन खंडाते, सतीश इवनाते, अक्षय चव्हाण, नितीन मोहोड, दिनेश धसकट यांनी रक्तदान केले. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या वतीने डॉ. संदेश यमलवाड, डॉ.श्रीकांत बोरकर, कर्मचारी मिलिंद तायडे, योगेश पानझाडे, संगीता गायधने, अविनाश जाधव, गौरव वाघमारे, जयवंत गावंडे, गजानन इंगळे यांनी परिश्रम घेतले. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

अंजनसिंगी येथे स्त्री शक्तीचा सन्मान आज

अंजनसिंगी : राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या २९९ व्या जयंतीनिमित्त ३१ मे रोजी 'सन्मान स्त्री शक्तीचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला धामणगावचे तहसीलदार भाऊ राव गाढवे व प्रा. विकास पुनसे उपस्थित राहतील. यामध्ये डॉ. प्रा .पल्लवी थोटे, प्रा. सुषमा थोटे, अर्चना धवणे, रुपाली गायकवाड, रिना जुवारे व सीमा तालन यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता मिरवणूक निघणार आहे. नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन समस्त धनगर समाज बांधव व वीर अहिल्यादेवी होळकर युवा क्रांती संघटनेने केले आहे.

निधन वार्ता

गणेश पाटील

धामणगाव रेल्वे : धामणगाव पंचायत समितीचे माजी सभापती सचिन पाटील यांचे वडील गणेश भिवाजी पाटील (६५) यांचे बुधवार, २९ मे रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले व एक मुलगी असा परिवार आहे.

रामकृष्ण इंगळे

असदपूर : रामकृष्ण मोतीराम इंगळे यांचे निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, तीन मुली, नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

निंभोरा, जनुना पांदण रस्त्याचे काम रखडले

स्थानिकांच्या विरोधाचा अडसर

पावसाळ्यापूर्वी काम पूर्ण करण्याची शेतकऱ्यांची मागणी

पुण्य नगरी / प्रतिनिधी

अंजनगाव बारी : 'मातोश्री ग्राम पांदण रस्ते' योजनेंतर्गत अंजनगाव बारी परिसरातील सात रस्त्यांच्या कामाला मंजुरात मिळाली आहे. त्या कामाला २१ फेब्रुवारीपासून सुरुवातही करण्यात आली; मात्र हे काम आता रखडले आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी तातडीने हे काम पूर्ण करण्याची मागणी होत आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून रस्त्याच्या कामाला गावातील मजुरांनी सुरुवात केली. त्यामुळे शेतकरीही आश्वस्त झाला होता; मात्र गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अंजनगाव बारी-निंभोरा व अंजनगाव बारी -जनुना रस्त्याचे काम स्थानिकांच्या विरोधामुळे रखडले असल्याची माहिती समोर आली आहे. जागेच्या वादावरून हे काम थांबले आहे. त्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी व तहसीलदार यांनी जमिनीची मोजणी करून नियमानुसार रस्ता करून देण्याची मागणी होत आहे. तसेच या कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे. आगामी पावसाळा लक्षात घेता शेतात जाण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू होणार आहे. लवकरात लवकर पांदण रस्ते झाल्यास बी-बियाणे तसेच इतर शेती उपयोगी साहित्यांची ने-आण करणे शेतकऱ्यांना सहज शक्यता होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

सुखदेवराव अभ्यंकर विद्यालयाचा निकाल ९७.१४ टक्के

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी : तालुक्यातून एकूण २ हजार ४३५ विद्यार्थी इयत्ता दहावीच्या परीक्षेला बसले होते. त्यापैकी २ हजार २८२ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन अंजनगाव तालुक्याचा निकाल ९३.७१ टक्के लागला आहे. तसेच श्री सुखदेवराव अभ्यंकर विद्यालय, हंतोडाचा निकाल ९७.१४ टक्के लागला आहे.

११ विद्यार्थी प्रावीण्य श्रेणीत आले आहे. प्रथम श्रेणीत ९, द्वितीय श्रेणीत ११ विद्यार्थी आहे. विद्यालयातून प्रथम क्रमांक ईश्वरी अरुण खिरकर (९०.४०), द्वितीय क्रमांक संजना विलास आठवले (९० टक्के), तृतीय क्रमांक जान्हवी विठ्ठल ढोले (८७.६० टक्के) हिने पटकाविला. सानिका बोंदरे, वैष्णवी झांबरे, वैष्णवी उईके ,श्रद्धा वानखडे, प्रेरणा खंडारे, स्नेहल वानखडे, सम्मीका वानखडे, संदेश आठवले यांनी प्रावीण्य श्रेणी प्राप्त केली. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर अभ्यंकर, संस्था अध्यक्ष क्षीतिज अभ्यंकर, मुख्याध्यापक केतन खिरकर आदींनी कौतुक केले.

अंजनसिंगी येथील श्रामणेर व अनागारिका शिबिराचा समारोप

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

धामणगाव रेल्वे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियानांतर्गत अंजनसिंगी येथे नुकताच श्रामणेर व अनागारिका शिबिर पार पडले.

शिबिराचे उद्घाटक म्हणून गजानन भेंडे, तर अध्यक्ष म्हणून प्रवीण हेंडवे उपस्थित होते. भंते धम्मसेन यांनी शिबिरामध्ये पंचशील, अष्टांगिक मार्ग अशा वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले. भंते धम्मतिष्य, भंते राहुल यांनी उपस्थितांन दीक्षा दिली. उज्वल हेंडवे यांनी या विद्यार्थ्यांना व श्रामणेर यांना स्पर्धा परीक्षा कशाप्रकारे दिल्या जाते आणि स्पर्धा परीक्षेचे महत्त्व काय, याबाबत मार्गदर्शन केले. ज्येष्ठ साहित्यिक गुलाब मेश्राम, निशांत दहाट, प्रवीण इंगळे व चेतन चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भगवान इंगळे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रकाश लिंगाटे, इंदु नारनवरे,जगदीश शिंदे, रवींद्र कांबळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पपीता मनोहरे, तर आभार प्रदर्शन ज्योती मेश्राम यांनी मानले. शिबिर यशस्वी करण्याकरिता राजाभाऊ मनोहरे, नितीन टाले, बंडू आठवले,मृदुला हेरोडे, दिघाडे,सुनील शिंदे, रमेश काळे, रवींद्र कांबळे,गजानन गवई आदींनी परिश्रम घेतले.

बालशिवाजी इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सुयश

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

अंजनगाव सुर्जी : गोरडे ग्रुप ऑफ एज्युकेशन अंतर्गत श्रीधर पाचघरे गुरुजी ज्ञान प्रबोधिनी, पश्नोटद्वारा संचालित बालशिवाजी इंग्लिश स्कूलचा माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे.

अमृता काळमेघ प्रथम

शाळेतून अमृता दीपक काळमेघ ही विद्यार्थिनी ९३.८० टक्के गुण घेऊन प्रथम, नूतन नितीन हाडोळे ९०.४० टक्के गुण घेऊन द्वितीय, तर मंजीरी सुशिल फुसे, प्रथमेश संतोष जयस्वाल व परिमल मोहन दातीर हे विद्यार्थी ९०.२० टक्के गुण घेऊन तृतीय आले आहे. तसेच दिव्यानी प्रवीण हाडोळे ८९.६० टक्के गुण घेऊन चौथी, तर अमृता केशव राऊत ८९.४० टक्के गुण घेऊन पाचवी आली. याशिवाय दीप सुरेश थोरात ८९.२० टक्के, संजीवनी शेषराव जाधव ८८ टक्के, कृष्णा विनोद हराळे ८५.४०टक्के, शशांक राजू टांक ८५ टक्के, नीलाक्षी गजानन अरबाड ८४.२०, नेत्रा संजय सुने ८३, रेहान शहा ७५.२०, सार्थक संजय भिसे ७४.६०, आदर्श नंदकिशोर धर्म ७४.२०, सोमेश्वर अनिल अस्वार ६९.२०, तन्वी प्रमोद अस्वार ६७.६०, अथर्व शिवचरण वाट ६१.२०, रिया नामदेव अंभोरे ५८.८०, श्रीहर्ष हरिदास गोळे ४८.४० हे विद्यार्थीही उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. श्रीकृष्ण गोरडे, संस्थाध्यक्षा प्रा. संगीता गोरडे, दामिनी गोरडे, मुख्याध्यापिका अर्चना सोनोने, वर्षा भोंडे आदींनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे.

पिंपळखुटा येथील श्री विवेकानंद विद्यामंदिराचा उत्कृष्ट निकाल

पुण्य नगरी / तालुका प्रतिनिधी

मोर्शी : श्री विवेकानंद सेवा संघ, लेहेगावद्वारा संचालित श्री विवेकानंद विद्यामंदिर, पिंपळखुटा मोठा येथील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत यशाची परंपरा कायम राखली.

एकूण २६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यामध्ये २४ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले. शाळेचा एकूण निकाल ९२.३० टक्के एवढा लागला. त्यामध्ये प्रथम क्रमांक देवयानी नेवारे हिने प्राप्त केला. द्वितीय क्रमांक स्नेहल वाकोडे, तृतीय क्रमांक साहिल धाकडे याने पटकाविला. विद्यार्थ्यांच्या उत्तुंग यशप्राप्तीकरिता मुख्याध्यापक सुदर्शन देशमुख, शिक्षकवृंद अमोल तट्टे, संजय बागडे, दीपाली ठाकरे, प्रिती भुजाडे, कमलेश लोखंडे, ज्योती वानखडे, विलास मडावी, अतुल गावंडे यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या उल्लेखनीय यशाबद्दल विवेकानंद सेवा संघ संस्थेचे अध्यक्ष डॉ. धनंजय तट्टे, उपाध्यक्ष नित्यानंद देशमुख, व्यवस्थापक बाबुजी तट्टे, सचिव प्रा. अरविंद तट्टे, सहसचिव शिवाजी पाटील, डॉ. संजय तट्टे, डॉ. आनंद बा. तट्टे, जय तट्टे, डॉ. कांचन तट्टे, आर. पी. पाटील, डॉ. गजानन चरपे, संजय अकोलकर, सरपंच नीलेश मरकाम, उपसरपंच विशाल निकम, शुभांगी मोगरकर, सोनाली देशमुख, मुख्याध्यापक सुदर्शन देशमुख, केंद्रप्रमुख संजय धांडे, नरेंद्र निकम आदींनी कौतुक केले.

एकलव्य गुरुकुलचे विद्यार्थी क्रीडा क्षेत्रासह अभ्यासातही अव्वल

इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९० टक्के निकाल

पुण्य नगरी / शहर प्रतिनिधी

नांदगांव खंडेश्वर : एकलव्य गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण प्राप्त केले.

राज्यस्तरीय शालेय नेटबॉल खेळाडू असलेली तनुश्री शेबे ही ९७.८० टक्के गुण घेऊन तालुक्यातून प्रथम आली. तसेच ज्ञानेश्वरी चोरे ९४.८० टक्के, ईश्वरी लायबर ९४.८०, तनुश्री काळेकर ९४.२०, वेदांत जोगे ९०.६०, अथर्व पवार ९०.६०, श्रावणी काळमेघ ८९.८०, श्रेया वंजारी ८९.८०, जयश्री चांदणे ८९.६०, हेमेश पवार ८८.२०, श्रावणी राणे ८८, श्रुती सावध ८७.४०, दिव्यानी कापडे ८६.६०, विवेक तुरणर ८४.८०, यश बोके ८४.६०, आनंदी लायबर ८४.२०, क्रिष्णा भोसले ८४.२०, श्रावणी गुल्हाने ८३.२०, श्रवण डांगे ८२, अनुराग मारोटकर ८१.२०, तर वेदांत गुल्हाने याने ८१.४० टक्के गुण मिळविले.विशेष म्हणजे यातील बहुतांश विद्यार्थी खेळाडूसुद्धा आहेत. एकलव्यचे मुख्य मार्गदर्शक सदानंद जाधव, मुख्याध्यापक विलास मारोटकर, व्यवस्थापक अनुप काकडे, प्रशिक्षक अमर जाधव, एकलव्य अकादमीचे अध्यक्ष विशाल ढवळे, उत्तम मुरादे, अधीर कडू, गजानन तऱ्हेकर, शिक्षक गजानन शेळके, श्रीकांत खांडेकर, स्वप्निल पाटील, मोहित झोपाटे, पंकज खांडेकर, ईश्वर जाधव, सुरेंद्र चोधरी, वैशाली भोयर, सीमा पोहोनकर, सुनीता मारोटकर, पूजा ठाकरे, रेवती परसनकर आदींनी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

TATA

टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

नोंदणीकृत पत्ता : ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०० ०१३.
शाखा कार्यालय : टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, केचे कॉम्प्लेक्स, पहिला मजला, बीओआयजवळ, राठीनगर, अमरावती.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) अंतर्गत)
सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ८ (६) सहवाचन नियम ९ (१) च्या तरतुदीअंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव सूचना

तमाम जनतेस आणि विशेषत: खालील निर्देशित कर्जदार/सहकर्जदारांना वा त्यांचे कायदेशीर वारस/प्रतिनिधींना (कर्जदार) सूचना देण्यात येत आहे की, टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. (टीसीएचएफएल) यांच्याकडे गहाण खालील निर्देशित स्थावर मालमत्ता, जिचा प्रत्यक्ष ताबा टीसीएचएफएल यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आलेला आहे, त्या मालमत्तेची खालील निर्देशित कर्जदार व सहकर्जदारांकडून थकीत रकमेच्या वसुलीसाठी ''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जी आहे'' व ''जी काही आहे तेथे आहे'' तत्त्वावर दि. **१९.०६.२०२४** रोजी विक्री करण्यात येत आहे. राखीव मूल्य व इसारा रक्कम ठेव खालील निर्देशित आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, विक्रीमध्ये कोणतीही तहकुबी/खंड न आल्यास सदर मालमत्तेची दि. **१९.०६.२०२४ रोजी दु. २.००** वाजता विक्री करण्यात येईल. ई-लिलावात सहभागासाठी इरठेचा धनाकर्ष असलेले मोहोरबंद लिफाफे टीसीएचएफएल यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे दि. **१८.०६.२०२४ रोजी सायं. ५.००** वाजता वा तत्पूर्वीपर्यंत शाखेचा पत्ता टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, केचे कॉम्प्लेक्स, पहिला मजला, बीओआयजवळ, राठीनगर, अमरावती येथे सादर करावेत.
प्रतिभूत संपत्ती/स्थावर मालमत्तेची विक्री खालील निर्देशित तपशिलानुसार ''जशी आहे जेथे आहे'' तत्त्वावर करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार/ सहकर्जदार/ कायदेशीर वारस/ कायदेशीर प्रतिनिधी/ हमीदारांचे नाव	मागणी सूचनेनुसार रक्कम	राखीव मूल्य	इसारा रक्कम	ताबा प्रकार
१	९७२३८२७ व ९७२३९७४	श्री. अमित नागोराव नाखले व श्रीमती प्रियांका कृष्णा खार्वे	करार क्र. ९७२३८२७ अंतर्गत तुमच्याद्वारे थकीत व देय रक्कम **रु. २५,८४,६१३/-** (रु. पंचवीस लाख चौऱ्याऐंशी हजार सहाशे तेरा मात्र) व करार क्र. ९७२३९७४ अंतर्गत तुमच्याद्वारे थकीत देय रक्कम **रु. १७,१८,८९२/-** (रु. सतरा लाख अठरा हजार आठशे ब्याण्णव मात्र) एकत्रितरीत्या **रु. ४३,०३,५०५/-** (रु. त्रेचाळीस लाख तीन हजार पाचशे पाच मात्र) व २१.०३.२०१८	रु. ३२,५०,०००/- (रु. बत्तीस लाख पन्नास हजार मात्र)	रु. ३,२५,०००/- (रु. तीन लाख पंचवीस हजार मात्र)	प्रत्यक्ष
२	९७००२५३ व टीसीएचएचएफ ०६२२०००१०००७०३८२	श्री. मनोज प्रकाशचंद असोपा व श्रीमती मधू मनोज असोपा	करार क्र. ९७००२५३ अंतर्गत तुमच्याद्वारे थकीत व देय रक्कम **रु. ५३,९२,४१२/-** (रु. त्रेपन्न लाख ब्याण्णव हजार चारशे बारा मात्र) व करार क्र. टीसीएचएचएफ०६२२०००१०००७०३८२ अंतर्गत तुमच्याद्वारे थकीत देय रक्कम **रु. ७,८९,५०८/-** (रु. सात लाख एकोणनव्वद हजार पाचशे आठ मात्र) एकत्रितरीत्या **रु. ६१,८१,९२०/-** (रु. एकसष्ट लाख एक्याऐंशी हजार नऊशे वीस मात्र) व ०१.११.२०२२	रु. ५४,००,०००/- (रु. चोपन्न लाख मात्र)	रु. ५,४०,०००/- (रु. पाच लाख चाळीस हजार मात्र)	प्रत्यक्ष
३	टीसीएचएचएल ०६२२०००१ ०००७११७४	श्री. मोहित सुनील साहू, श्रीमती नीता सुनील साहू	रु. २०,२९,१४१/- (रु. वीस लाख एकोणतीस हजार एकशे एक्केचाळीस मात्र) व ३१.१०.२०२२	रु. १८,९०,०००/- (रु. अठरा लाख नव्वद हजार मात्र)	रु. १,८९,०००/- (रु. एक लाख एकोणनव्वद हजार मात्र)	प्रत्यक्ष
४	टीसीएचएचएफ ०६२२००० १०००८१६३१	श्री. राधेश्याम रामबिलासजी सोनी, श्रीमती सरोज राधेश्याम सोनी	रु. ८,८८,१३३/-(रु. आठ लाख अठ्ठ्याऐंशी हजार एकशे तेहतीस मात्र) व २६.१२.२०२२	रु. ८,४०,०००/- (रु. आठ लाख चाळीस हजार मात्र)	रु. ८४,०००/- (रु. चौऱ्याऐंशी हजार मात्र)	प्रत्यक्ष

स्थावर मालमत्तेचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : अमरावती महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीतील व उपनिबंधक अमरावती यांच्या कार्यक्षेत्रीय, क्षेत्रीय सर्व्हे क्र. ११, भूखंड क्रमांक ५८ पार्ट, म्हाडाद्वारे मध्यम उत्पन्न गट योजनेअंतर्गत विकसित, भूखंड क्र. एम-१९, मोजमापित १६२ चौ. मी. क्षेत्रफळाच्या सदर जमिनीतील, त्यावरील निवासी इमारतीसह मौजे अकोली, परगणे बडनेरा, ता. व जि. अमरावती. **सीमा** : पूर्वेस : प्लॉट क्र. २४, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट क्र. २०, दक्षिणेस : प्लॉट क्र. १८.

स्थावर मालमत्तेचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : अमरावती महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीतील व उपनिबंधक अमरावती यांच्या कार्यक्षेत्रीय, क्षेत्रीय सर्व्हे क्र. ३३/२, महसूल केस नं. एनपीए ३४/पेठ अमरावती २९/१९७७, ७८ आदेश दि. ०८.०६.१९७९, त्यातील ले-आऊट प्लॉट नं. २१ अंतर्गत बिगरशेतजमिनीत परिवर्तित, पूर्व-पश्चिम विभागाच्या सदर भूखंडाच्या उत्तर भागापैकी, मोजमापित १६९० चौ. फूट व १३० चौ. फुटांचा अतिरिक्त भाग, एकूण मोजमापित १८२० चौ. फूट, त्यावरील निवासी इमारतीसमवेत, मौजे पेठ अमरावती, परगणे बडनेरा, ता. व जि. अमरावती. **सीमा** : पूर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट क्र. ६, उत्तरेस : पोहेकर यांचे घर, दक्षिणेस : नखाते यांचे घर.

स्थावर मालमत्तेचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : ग्रामपंचायत नांदगाव पेठच्या स्थानिक हद्दीतील व उपनिबंधक अमरावती ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रीय मालमत्ता, क्षेत्रीय सर्व्हे क्र. २९/१, महसूल केस नं. एनपी ३४/तारखेडा ५/१९७५, १९७६ अंतर्गत बिगरशेतजमीन म्हणून परिवर्तित. सदर परिवर्तन आदेश २२.११.१९७८ रोजी मंजूर करण्यात आला आहे. त्यातील प्लॉट क्र. ४४, मोजमापित २९५.१३ चौ. मी. (३१८० चौ. फूट), त्यावरील 'भूमी रेसिडेन्सी' नावाने व पद्धतीने निर्मित निवासी इमारत, त्यातील फ्लॅट क्र. टी२ बी, एकूण बिल्टअप क्षेत्र ३९.४९ चौ. मी., तिसरा मजला, त्यातील १०.२७% अविभाजित हिस्श्यासहित, मौजे तारखेडा, परगणे बडनेरा, ता. व जि. अमरावती. **सीमा** : पूर्वेस : प्लॉट क्र. ४३, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : रस्ता, दक्षिणेस : सर्व्हिस लेन.

स्थावर मालमत्तेचे विवरण : पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड : अमरावती महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीतील व उपनिबंधक अमरावती यांच्या कार्यक्षेत्रीय, नझूल शीट नं. ८१डी, प्लॉट क्र. २४४/१, मोजमापित ४९२.८१ चौ. फूट (४५.८ चौ. मी.), त्यावरील निवासी, घरासहित, मौजे गावठाण अमरावती, परगणे नांदगाव पेठ, ता. व जि. अमरावती. **सीमा** : पूर्वेस : भुरेखान यांचे घर, पश्चिमेस : रामबिलासजी सोनी यांचे घर, उत्तरेस : घर क्र. ७/२१०, दक्षिणेस : घर क्र. ७/२१२.

विक्रीच्या वेळेस, सर्वसामान्य जनतेला त्यांच्या निविदा व्यक्तिगत स्वरूपात सादर करण्यासही आमंत्रित करण्यात येत आहे. कर्जदार/सहकर्जदारांना याद्वारे सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून **१५ दिवसांच्या** आत पुढील व्याजासहित संपूर्ण थकबाकीचे प्रदान करण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे, यामध्ये कसूर झाल्यास वेळापत्रकानुसार स्थावर मालमत्तेची विक्री करण्यात येईल. वरीलप्रमाणे लिलावाच्या दिनांकापूर्वी प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे व्याज व मूल्यासहित (विक्रीच्या मूल्यासहित रक्कम प्रदान केल्यास वा असा प्रतिभूत कर्जाची रक्कम, व्याज व मूल्यासहित प्रदान केल्याचा पुरावा त्यांच्या संतुष्टीकरिता सादर केल्यास ई-लिलाव थांबविण्यात येईल. विक्रीसंदर्भात कामकाजाशी संबंधित कोणीही अधिकारी वा व्यक्ती प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वरूपात मालमत्तेच्या विक्रीमध्ये कोणत्याही हितसंबंधाकरिता बोली लावणे, संपादन करणे किंवा प्रयत्न करू शकत नाही.
विक्री ही सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ मध्ये विहित अटी तसेच खालील पुढील अटींच्या अधीन असेल.
टीप : मालमत्तांचा ई-लिलाव पोर्टल http://www.bankauctions.com **च्या माध्यमातून दि. १९.०६.२०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.०० या वेळेत, प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह आयोजित करण्यात येईल.**
अटी व शर्ती : १. अनुसूचीमध्ये विवरणीत तपशील हा अधोहस्ताक्षरितांच्या सर्वोत्तम माहितीनुसार आहे; परंतु सदर उद्घोषणेमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी, चुकीचे विवरण व मजकूर गहाळ होणे, याकरिता अधोहस्ताक्षरित जबाबदार नाहीत. बोली रकमेसंदर्भात किंवा बोलीदारासंदर्भात कोणताही विवाद उद्भवल्यास लॉटचा पुन्हा एकदा लिलाव करण्यात येईल. **२.** राखीव मूल्याखाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही. **३.** बोली विस्तार रक्कम रु. १०,०००/- (रु. दहा हजार मात्र) इतकी असेल. **४.** मालमत्तेच्या खरेदीसाठी सादर करण्यात आलेल्या सर्व बोलींसमवेत वर उल्लेखित इसारा रक्कम ''टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि.''च्या नावे शाखेच्या पत्त्यावर देय धनाकर्ष स्वरूपातून पाठवावेत. अयशस्वी बोलीदारांचे धनाकर्ष लिलावापश्चात परत करण्यात येतील. एनईएफटी/आरटीजीएस/आयएमपीएस माध्यमातून इरठेच्या प्रदानासाठी कृपया प्राधिकृत अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा. **५.** सर्वोच्च बोलीदारास कोणत्याही लॉटसंदर्भात खरेदीदार म्हणून घोषित करण्यात येईल, अर्थात तो बोलीसाठी कायदेशीररीत्या पात्र असावा व पुढे त्याच्याद्वारे सादर करण्यात आलेली बोली रक्कम ही राखीव मूल्याहून कमी नसावी. दिलेली प्रस्ताव रक्कम ही स्पष्टपणे अपुरी दिसत असल्यास, ती अनुचित असल्याने, सर्वोच्च बोलीचा स्वीकार नाकारण्याचा अधिकार हा प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या संपूर्ण अखत्यारित असेल. **६.** नोंदीत कारणासाठी, विक्री रद्द/स्थगित करण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या अखत्यारित आहे. **७.** स्थावर मालमत्तेचे परीक्षण दि. **११.०६.२०२४** रोजी स. ११.०० ते सायं. ५.०० या वेळेत पूर्वभेट निश्चितीद्वारे करता येईल. **८.** खरेदीदार म्हणून घोषित झालेल्या व्यक्तीस सदर घोषणेपश्चात खरेदी रकमेच्या/बोलीच्या पंचवीस टक्के रक्कम जमा करावी लागेल, जी रक्कम २४ तासांच्या आत प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे जमा केलेल्या इरठे रकमेसमवेत असेल, अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात कसूर झाल्यास नवीन लिलाव/खाजगी कराराद्वारे विक्रीतून मालमत्तेची पुन:विक्री करण्यात येईल. **९.** वरीलप्रमाणे प्रारंभिक रक्कम जमा केल्यानंतर खरेदी रकमेच्या उर्वरित रकमेचे प्रदान खरेदीदारांना प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे मालमत्तेच्या विक्री निश्चितीच्या तारखेपासून सदर दिवस वगळून, १५व्या दिवशी वा तत्पूर्वीपर्यंत करावे लागेल, १५व्या दिवशी रविवार वा सुट्टी असल्यास १५व्या दिवसानंतरच्या प्रथम कार्यदिवशी जमा करावी. **१०.** वर नमूद कालावधीमध्ये कोणत्याही प्रदानात कसूर झाल्यास नवीन लिलाव/खाजगी कराराद्वारे विक्रीतून मालमत्तेची विक्री करण्यात येईल. इरठेसमवेत जमा रक्कम टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. द्वारे जप्त करण्यात येईल व कसूरदार खरेदीदाराचा नंतर विक्री करण्यात यावयाच्या सदर मालमत्ता वा तिच्या कोणत्याही भागावरील दावा जप्त करण्यात येईल. **११.** टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. यांना ज्ञात मालमत्तेवरील भार काही असल्यास त्यांचा तपशील : नाही. दावे, काही असल्यास जे पुढे आलेले आहेत व अन्य ज्ञात तपशील जो माल